# हवामान आधारीत कृषि सल्ला


## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com


### ६) जिल्हा: नंदुरबार हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७ एप्रिल, २०२५

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१८/०४/२०२५ ते २२/०४/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ४२ | ४२ | ४१ | ४१ | ४१ |
| किमान तापमान (अं.से.) | २५ | २५ | २५ | २४ | २५ |
| ढग स्थिती (आकाश) | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |
| स. सापेक्ष आर्द्रता (%) | ५३ | ५७ | ६० | ५६ | ५५ |
| दु. सापेक्ष आर्द्रता (%) | २१ | १९ | २० | १८ | १६ |
| हवेचा वेग (किमी/तास) | १२ | १२ | १२ | ९ | ६ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| | | |
|---|---|---|
| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार जिल्ह्यात पुढील पाच दिवस आकाश कोरडे राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ४१ ते ४२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २४ ते २५ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. |
| पुढील आठवड्याचा विस्तारित श्रेणी हवामान अंदाज | | दि. २२ ते २८ एप्रिल २०२५ दरम्यान मध्य महाराष्ट्रात कमाल व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे. |
| पीक | अवस्था | कृषी विषयक सल्ला |
| सामान्य सल्ला | | पिकात आंतरमशागत करून तणविरहीत ठेवावीत. पिकांवर किडीचा व रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास वेळेवर पीक संरक्षण करावे. |
| संदेश | | तापमान वाढल्याने पिकास गरजेनुसार संरक्षित पाण्याची पाळी देण्याची व्यवस्था करावी. |
| भुईमुग | आऱ्या सुटण्याची अवस्था | भुईमूग पिकात टिक्का व तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास २५ ग्रॅम मॅन्कोझेब (डायथेन एम-४५)+ २५ ग्रॅम बाविस्टीन १० लि. पाण्यात मिसळून फवारावे. भुईमूगास आ-या सुटण्याची अवस्था (४० ते ४५ दिवस) या अवस्थांमध्ये संरक्षित पाण्याची पाळी द्यावी. |
| बाजरी | दाणे भरण्याची अवस्था | तापमान वाढल्याने दाणे भरण्याच्या अवस्थेमध्ये संरक्षित पाण्याची पाळी द्यावी. पेरणीनंतर ६० आणि ६५ दिवसांनी पिकावर डीएपी (१८:४६:००) किंवा १९:१९:१९ या विद्राव्य खताच्या २ % द्रावणाची २० ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. |
| तीळ | फांद्या फुटण्याची ते फुलोरा अवस्था | तापमान वाढल्याने जमिनीच्या मगदुराप्रमाणे पिकास १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. फुले येण्याच्या आणि बोंडे धरण्याच्या काळात पाण्याचा ताण पडू देऊ नये. |
| केळी | घड वाढीची अवस्था | तापमान वाढल्याने केळी पिकास पाण्याचा ताण पडू देऊ नये. ठिबक सिंचन पद्धतीने गरजेनुसार पाणी द्यावे. केळीची वाळलेली पाने (रोग विरहीत), उसाचे पाचट, गव्हाचा भुसा यांचा वापर करून सेंद्रिय आच्छादन करावे ज्यामुळे जमिनीचे तापमान कमी होऊन बाष्पीभवन कमी होईल. बागेभोवती सजीव कुंपण शेवरी, बांबू, गजराज गवत किंवा हिरव्या शेडनेटचे वारा प्रतिरोधक उभारावे. ज्यामुळे बागेचे उष्ण हवेपासून संरक्षण होते. केळीच्या घडाचे तीव्र सूर्यप्रकाशापासून संरक्षण करण्यासाठी स्कर्टींग बॅग किंवा वाळलेल्या केळीच्या निरोगी पानांनी झाकावेत. |
| पपई | फळ वाढीची अवस्था | तापमान वाढल्याने पपई पिकास पाण्याचा ताण पडू देऊ नये. ठिबक सिंचन पद्धतीने गरजेनुसार पाणी द्यावे. वाळलेली पाने (रोग विरहीत), उसाचे पाचट, गव्हाचा भुसा यांचा वापर करून सेंद्रिय आच्छादन करावे ज्यामुळे जमिनीचे तापमान कमी होऊन बाष्पीभवन कमी होईल. बागेभोवती सजीव कुंपण शेवरी, बांबू, गजराज गवत किंवा हिरव्या शेडनेटचे वारा प्रतिरोधक उभारावे. ज्यामुळे बागेचे उष्ण हवेपासून संरक्षण होते. घडाचे तीव्र सूर्यप्रकाशापासून संरक्षण करण्यासाठी स्कर्टींग बॅगने झाकावेत. |
| ऊस | वाढीची | तापमान वाढल्याने सुरु ऊस लागवडीनंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे ८ ते १० दिवसाचे अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पाणी शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी द्यावे. |

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com


| | | |
|---|---|---|
| **पशुसंवर्धन** | - | तापमान वाढल्याने जनावरांना सुरक्षित ठिकाणी गोठ्यातच ठेवावे व गोठ्यात पुरेसा गारवा राहील याची व्यवस्था करावी. पिण्यास थंड पाणी द्यावे आणि हिरवा चारा द्यावा. |
| **कुक्कुटपालन** | - | तापमान वाढल्याने कोंबड्यांना उष्माघातापासून वाचविण्यासाठी त्यांना आच्छादित भिंत व छताच्या शेडमध्ये ठेवावे. छताची सफाई करावी व पांढरा रंग द्यावा. छतावर वाळलेल्या गवताच्या पेंढ्या, भाताचा कोंडा टाकावा व त्यास ओले ठेवावे. दिवसातून तीन-चार वेळेस छतावर पाण्याची फवारणी करावी. असे केल्याने शेडमधील तापमान कमी होऊन कोंबड्यांना थंडावा मिळतो. शेडच्या एका बाजूला पोत्याचे पडदे लावून त्यावर पाणी शिंपडावे, जेणेकरून शेडमध्ये थंडपणा राहील. शेडमध्ये पंख्याचा वापर करावा, ज्यामुळे हवा खेळती राहील व आत असलेली उष्णता बाहेर टाकली जाईल. |

**स्त्रोत**

**१) हवामान पूर्वानुमान : भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई.**

**ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**

**दि. : १७/०४/२०२५**

**स्वाक्षरीत**

**प्रमुखअन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**

□